
VOL. 4 | ISSUE 6 | NOVEMBER 2018

ISSN: 2454-5503
IMPACT FACTOR: 4.197(IIJIF)

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A Peer Reviewed Bimonthly International Journal



*Chief Editor*

**Dr Kalyan Gangarde**

Scanned by CamScanner

# CONTENTS


| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Dr B R Ambedkar and the Contemporary Ambedkarite Movement: A Critical Analysis | Milind Pandit | 05 |
| 2. | Power, Guilt, and Atonement in Khaled Hosseini's *The Kite Runner* | Suborna Haque | 10 |
| 3. | Unheard Voices of Women Narratives in Historical Trauma Fictions/Films | Ashwini R. Bhore<br>Dr Smita Nagori | 13 |
| 4. | Amitav Ghosh's Hungry Tide as a Climate Change Fiction | Soumya S.J | 16 |
| 5. | Patronage of Maratha Rulerson the Temples making in the Thanjavur Region (1676-1855) | Dr. P. Selvamani | 21 |
| 6. | Organisation and Administration of Monasteries in Thanjavur (1532-1855 A.D.) | Dr. P. Selvamani | 25 |
| 7. | Relationship between Socio-Economic Status and Sports Performance | Bharat H.Chapke | 32 |
| 8. | A Comparative Study of Socio-Economic Status of Kabaddi And Kho-Kho Players | Dr. P.L. Karad | 34 |
| 9. | 'दोहरा अभिशाप' में चित्रित दलित स्त्री चेतना | डॉ.श्रीरंग वट्टमवार | 36 |
| 10. | "प्रशासन की कला" - एक सिंहावलोकन | डॉ.श्रीमती कल्पना वैश्य | 38 |
| 11. | डॉ. शिवप्रसाद सिंह के उपन्यासों में चित्रित सामाजिक समस्याएँ | वाई. वेंकट लक्ष्मी | 40 |
| 12. | जीवनात कलांचे महत्व | अभय करंदीकर | 43 |
| 13. | खेळातील अजिंक्य मालीकेचे सातत्य कायम ठेवण्या करीता 'संगठण व प्रशासनाचे' महत्व : एक अभ्यास | प्रा.उमेश साडेगावकर<br>डॉ. छत्रपती पांगारकर | 50 |
| 14. | भारतातील औद्योगिक कलह : कारणे, परिणाम व उपाय | प्रा. डॉ. टी.जी. सिराळ | 52 |
| 15. | माहिती तंत्रज्ञानाचा लोकप्रशासनावरील प्रभाव | प्रा. डॉ. कदम डी.एम. | 58 |
| 16. | भारतीय राज्य घटनेमधील महिला व बाल कल्याणा संबंधातील तरतुदी | प्रा. डॉ. जाधव एस.बी. | 61 |
| 17. | बीड जिल्ह्यातील किशोर - किशोरींच्या व्यक्तीमत्व विकासाचा अभ्यास | डॉ. सुनिता पटवर्धन/जोगळेकर<br>प्रा.ए.बी.वाळके | 64 |
| 18. | The Novel and the Cinema: Sharat Chandra's 'Bindur Cheley' and its Cinematization by K.B.Tilak | Sukriti Pal<br>Dr Archana Agrawal | 67 |
| 19. | The Image of Indian Women in the Short Stories of Munshi Premchand | Ram Khilari | 70 |
| 20. | Problems of Women Workers in India | Dr. C. Muralikumaran | 73 |




Scanned by CamScanner

**16.**

# भारतीय राज्य घटनेमधील महिला व बाल कल्याणा संबंधातील तरतुदी

**प्रा. डॉ. जाधव एस.बी.**
गृह विज्ञान, मिल्लिया महाविदयालय, बीड.
shamalbjadhav511@gmail.com

**प्रस्तावना :**

जगाच्या पाठीवर आतापर्यंत अगणित माणसे जन्माला आली आणि गेली. जन्माला आल्यानंतर प्रत्येकजण स्वत:साठी आपले जीवन जगण्याचा प्रयत्न करत असतो. धडपडत असतो. तर काही जण स्वत:साठी जगतांना इतरांसाठीही चांगले करण्याचा प्रयत्न करतात. परंतु जगामध्ये असे काही माहापुरूष होऊन गेले की, ते स्वत:साठी विशेष कधीच जगले नाहीत. आपले संपूर्ण जीवन दूसऱ्यासाठीच सर्मपित केले. त्यापेकी भारतात जन्माला आलेले तथागत बुद्ध आणि भरतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे होय. ही गुरूशिष्याची जोडी आपल्या महान कर्तृत्वाने संपूर्ण जगात सर्वाधीक प्रसिद्ध पावली आहे. त्यांनी या देशातील वंचितासाठी, सर्वसामान्य माणसाठी केलेले कार्य हे विश्वातील अखंड मानव जातीसाठी प्रेरणादायी ठरले आहे. म्हणून हे गुरू-शिष्य जगदवंदनीय ठरले आहेत.

समाजातील दलित, पीडत, शोषित, वंचीत आणि निराधाराप्रती त्यांच्या ठायी प्रचंड करूणा होती. सर्वोच्च पदाला पोहचल्यावरही गरीब-श्रीमंत, उच्च-नीच असा कधीही भेदभाव केला नाही. तथागत बुद्धानंतर आडीच हाजार वर्षानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवाचा या पृथ्वीवर जन्म झाला. बुद्धानंतर त्यांच्या विचाराची उंची जगातील एकाही महापुरूषाला गाठता आली नाही. तथागताचे महान ज्ञानी शिष्य आणि प्रगल्भबुद्धीचा एक महान विदवान, महापंडित म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर उभ्या विश्वाला सुपरिचीत आहेत. या शिवाय डॉ. बाबासाहेब हे सामाजीक, आर्थिक आणि राजकिय दृष्टीकोनातून मानवी अधिकाराचे समर्थक व मानवाच्या स्वातंत्र्यासाठी महान योद्धा होते. २९ ऑगस्ट १९४७ रोजी संविधान सभेने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली घटनेच्या मसुदा समितीची नेमणूक केली, व त्यानूसार २६ नोव्हेंबर १९४९ रोजी राज्यघटना स्वीकृत करून ती २६ जानेवारी १९५० पासून ती आमलात आणली गेली. या राज्यघटनेमध्ये मानवी अधिकारासंदर्भात मुलभूत हक्क व मुलभूत कर्तव्याचा समावेश करून नागरीकांचे कल्याण हे प्रत्येक राज्याचे उद्दिष्ट्ये असेल पाहिजे व त्या नूसार त्यांना अधिकार असणे हे आधुनिक काळातील व्यक्ती स्वातंत्र्यासाठी महत्वाचे मानले गेले. या मानव अधिकारात स्त्री पूरूष व बालक यांच्या अधिकारासंबंधी विस्तृत माहिती दिलेली आहे. त्यामुळे भारतात लोकशाही अस्तित्वात आलेली दिसून येते. अशा प्रकारे भारतीय संविधानात करण्यात आलेली महिला व बालकल्याण संबंधीची तरतूद ही त्याचे एक दयोतक म्हणून ओळखले जाते.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

१) भारतीय राज्य घटनेतील बाल हक्काविषयक तरतुदींचे अध्ययन करणे.

२) राज्य घटनेत मूलभूत अधिकारात स्त्रीच्या झालेल्या सुधारणेचा अभ्यास करणे.

**संशोधनाची गृहितके :**

१) भारतीय राज्यघटनेने महिलां व बालकल्याण साधले आहे.

२) भारतीय राज्य घटनेमुळे महिला व बालकांचा सामाजिक, बौद्धीक स्तर उंचावला आहे.

*** संशोधनासाठी वापरण्यात आलेली पद्धती**

**अध्ययन पद्धती :**

कोणत्याही संशोधकाला संशोधन जर करायचे असेल तर संशोधन हे वैज्ञानिक पद्धतीवर आधारीत असणे गरजेचे असते. जे संशेधन वैज्ञानिक पद्धतीवर आधारती असते त्याच संशोधनाला प्रमाण मानले जाते नाही तर संशोधन हे केवळ माहितीचा संग्रहच असते. म्हणून प्रस्तूत शोध निबंधासाठी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा उपयेग करण्यात आला आहे. एखादया व्यक्ती, समुह, समाज घटना किंवा कोणत्याही विषय किंवा समस्यांच्या वास्तविक तथ्यांचे वैशिष्टे याचे वर्णनात्मक विवेचन प्रस्तुत करण् हा वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा मुख्य उद्देश आहे. वैज्ञानिक पद्धतीने संकलीत केलेल्या तथ्यांच्या आधारे वर्णनात्मक विश्लेषण करणे म्हणजे वर्णनात्मक संशोधन आराखडा होय तसेच तथ्य संकल्पनासाठी दुय्यम तथ्य सामग्रीचा उपयोग करण्यात आला आहे. यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महिलाविषयी व बालकांच्या कल्याणासाठी कार्य पहात असताना त्यांनी दिलेली भाषणे, लिहीलेली ग्रंथ त्यांच्या माध्यमातून महिला व बालकल्याणाविषयी त्यांचे काय योगदान आहे हे स्पष्ट करता येते.

**भारतीय संविधान व स्त्रियांचे हक्क स्थिती :**

भारतीय राज्यघटनेत महिलांच्या कल्याणासाठी खास तरतुदींचा समावेश केला आहे. कायदे करतांना या तरतुदी मार्गदर्शन तत्वे बनतात. घटनेच्या प्रस्तावनेतच समान दर्जा व संधीचा उल्लेख आहे मुलभूत हक्काबाबत कलम १४,१५ व १६ यामध्ये समतेची तरतूद आहे. कलम १४ मध्ये समतेच्या सर्व साधारन तरतुदी आहेत. कलम ३९ (V) प्रमाणे महिलांना चारितार्थाच्या साधनांचा मुलभुत अधिकार आहे. कलम ३९ (m) प्रमाणे एकाच कामासाठी पुरूष व महिलांना सारखाच मोबदला हवा कलम ४२ प्रमाणे महिलांना



Scanned by CamScanner

कामासाठी सुयोग्य न्याय व वातावरण तसेच प्रसुती सुविधा मिळायला पाहिजेत.

राज्यघटनेने महिलांना समान वागणुक मिळावी म्हणून अनेक तरतूदी केल्या आहेत. त्यांना अनसरून महिलाधोरणाची आखणी केली आहे. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात ब्रिटीश सरकारने स्त्रियांसाठी केलेले सुधारणाविषयक कायदे व शिक्षण विषयक धोरणामुळे स्त्री सक्षमीकरणाला मोठी चालना मिळाली आहे. सती प्रथा, बालविवाह, विधवा विवाह, केशवपण इ. अनिष्ठरूढी कायद्याने बाद ठरवल्या.

१९५० मध्ये भारतीय घटनेने स्वीकारलेल्या स्वातंत्र्य, समता व न्याय या धोरणामूळे तसेच स्त्रीविषयक सुधारणावादी धोरणामुळे त्यांचा सामाजिकस्तर उंचावण्यास मदत झाली. लोकशाहीचे माहेरघर असणाऱ्या इंग्लंडमध्ये स्त्रियांना मदतदानाचा अधिकार (१९१८) फार उशीरा मीळाला परंतु भारतीय राज्यघटनेने हा अधिकार त्वरीत देऊन त्यांना राजकिय सहभागाची संधी दिली.

भारतीय घटनेने स्वीकारलेल्या समतेच्या धोरणाला अधिक वास्तवपूर्ण करण्यासाठी शासनाने अनेक महत्वपूर्ण कायदे ध्येयधोरणे व योजना कार्यान्वित केल्या आहेत. १९५५ हिंदू विवाह कायदा, १९६१ चा हुंडाबंदी कायदा १९७१ चा वैद्यकिय गर्भपात कायदा, १९७६ चा समान वेतन कायदा तसेच बालविवाह व प्रतिबंधक कायदा, १९८३ चा बलात्कार प्रतिबंधक कायदा १९८४ चा लिंग निर्धारण प्रतिबंधक कायदा १९८६ चा वेशाव्यवसाय प्रतिबंधक कायदा १९८७ चा स्त्रीविरूद्ध हिंसा वपिळवणूक प्रतिबंधक कायदा, २००५ चा कौटुंबीक हिंसाचार कायदा याशिवाय १९९० ला स्वतंत्र राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना करून स्त्रियांच्या शोषणाला प्रतिबंध घालण्याचा प्रयत्न केला आहे.

शिवाय तीसऱ्या चौथ्या व सहाव्या पंचवार्षिक योजनेत अनुक्रमे स्त्रियांचे शिक्षण, आरोग्य आणि नोकरी यांना प्राधान्य दिले आहे. सातव्या योजनेत त्याच्या सामाजिक व आर्थिक विकासाची उदिष्टे निश्चित करून, नवव्या योजनेत स्त्रियांचा विशेष घटक योजनेत (Special Component Plan) समावेश करून त्या दृष्टीने विविध उपाय योजना केल्या आहेत.

**भारतीय राज्यघटनेत बालहक्क विषयक तरतुदी :**

आजचे बालक हे उदयाचे नागरीक आहेत. ते देशाचे आधारस्तंभ आहेत त्यांच्या विकसावरच उदयाच्या जगाचे, समाजाचे भवितव्य अवलंबून आहे. हेरॉल्ड लास्की याने म्हटल्याप्रमाणे मानवाला विवक्षित हक्क असल्याशिवाय स्वत:चा विकास साध्य करता येत नाही.बालकांनाही काही हक्क दिल्याशिवाय ते विकसीत होणार नाहीत. त्यामुळे त्यांच्या हक्काकडे आणि विकासाकडे विशेष लक्ष देण्याची अत्यंत आवश्यकता आहे. बालक म्हणजे १८ वर्षाखालील मुले अशी व्याख्या करण्यात आली आहे. पूर्व राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे अब्दूल कलाम यांच्या मतानूसार मुले ही राष्ट्राची संपत्ती आहे व त्यांचे पोषण व स्वास्थ्य ही प्रत्येक नागरीकाची जबाबदारी आहे. त्या अनुषंगाने ८६ व्या घटना दुरूस्ती नूसार सर्व बालकांना (६ ते १४ वर्ष वयोगटातील) शिक्षणाचा मूलभूत अधिकार प्रदान करण्यात आलेला असून घटनेच्या २१ (क) कलमात Right to Education या सदराखाली मोफत व सक्तीच्या शिक्षणाची हक्क म्हणून तरतुद करण्यात आली आहे. शिवाय राज्य, सर्व बालकासाठी त्यांच्या वयाची सहा वर्ष पूर्ण होईपर्यंत, प्रारंभीक बाल्यावस्थेतील देखभाल आणि शिक्षण यांची तरतूद करण्याकरीता प्रयत्न करील असे राज्यघटनेच्या ४५ व्या मार्गदर्शक तत्त्वामध्ये नमूद केलेले असून ६ वर्षाखालील बालकांच्या संगोपन व शिक्षणाची विहीत जबाबदारी राज्यावर टाकलेली आहे.

तसेच घटनेच्या कलम ५१ (C) मध्ये समाविष्ट असणाऱ्या मूलभूत कर्तव्याच्या यादीत वाढ करून ११ वे कर्तव्य म्हणून ६ ते १४ वर्ष वयापर्यतच्या सर्व अपत्य/पाल्य यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबंधीत आई-वडिलांची पालकांची राहील असे म्हटले आहे. घटना कलम १४ ते ३२ मधील विविध तरतुदी मूलभूत अधिकार प्रदान करून एक प्रकारे विकासाची हमीच देऊ करतात.

**बालहक्क व करारातील कलमांचा सारांश :-**

१) प्रत्येक बालकाला वंश, लिंग, धर्म, भाषा, पालकांची राजकिय मते इत्यादी कोणताही भेदभाव न करता हक्क मिळावे.

२) खाजगी अगर सरकारी संस्था कोर्ट अगर शासकिय अधिकारी वगैरे सर्वांनी मुलींबद्दल काही निर्णय घेतांना मुलाचे हित हाच अग्रेसर विचार ठेवावा.

३) प्रत्येक बालकास विशेषत: मुलींना जगण्याचा अधिकार आहे.

४) मुल जन्मल्याबरोबर त्यांची नोंद करावी आणि त्यात नाव, गाव, राष्ट्रीयता नमूद करावे.

५) बालकांना शिक्षणाच्या हक्कापासून वंचीत ठेवू नये.

६) जास्तीत जास्त निरोगी आयुष्य जगण्याचा आणि आजारीपणात वैद्यकिय मदत मिळण्याचा हक्क.

७) पालण पोषण विकासाचा हक्क.

८) शारीरिक व मानसिक आत्याचारापासून संरक्षणाचा हक्क.

९) प्रत्येक बालकाला विश्रांती, खेळ, करमणूक, सांस्कृतिक जीवन, कला यात भाग घेण्याचा हक्क.

१०) लैंगिक, शोषणापासून अगर लैंगिक गैरप्रकारापासून बालकांचे संरक्षणाचा हक्क.

११) मुलाला आपले विचार प्रकट करण्याचा हक्क.

१२) मुलाला स्वत:च्या हितासंबंधी सर्व गोष्टीबद्दलमत देण्याचा हक्क.

१३) मुलाच्या सार्वजनिक हिताचा विचार करता आपल्या आई वडिलांजवळ राहण्याचा हक्क आहे.

**उपाय योजना:**

१) स्त्रियांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणणाऱ्या प्रथांचा त्याग करावा.

२) स्त्रियांना सक्षम बनवणे आवश्यक आहे.

३) स्त्रियावरील बलात्कार विनयभंग यासारख्या लैंगिक अत्याचाराला पायबंध घातला पाहिजे.



Scanned by CamScanner

४) बालकांना त्यांच्या हक्क आणि कर्तव्याची जाणीव जागृती करूण देणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष :-**

भारतीय राज्यघटनेने मानवाला दिलेलया अधिकारामुळे भारतात लोकशाही असून येथे गरिब श्रीमंत भेद नाही. कायदयाने समान केले आहे. नव्या सुधारित २००० च्या बाल न्याय अधिनियमानूसार मुलांची काळजी व संरक्षण दिल्या जाऊ लागले आहे. तसेच राज्यघटनेमुळे स्त्रियांना, मान सन्मान, प्रतिष्ठा प्राप्त झाली. समानता प्राप्त झाली. तसेच स्वाभीमानाची भावना निर्माण झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांच्या उद्धारासाठी अलौकीक कार्य केले. समता, स्वातंत्र्य बंधुत्व व त्रिसुत्रींची व्यापकता या तरतुदीद्वारे दिसूनयेते.

**संदर्भ ग्रंथः**

१) मानवी हक्क व सामाजिक न्याय, एप्रिल २०११ मासिक योजना.
२) मानव अधिकार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर - संपादक.
३) युग पुरूष डॉ. बाबासाहेब आंबेडकर : लेखक : डॉ. तगलवाड डॉ. रवि एन. सरवदे
४) दै. सम्राट वृत्तपत्रे.

❑❑❑



Scanned by CamScanner